## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १८१/२०२४ मधील निशाणी २ वर आदेश

CNR NO.MHAK070013292024
(दिनांक २४ ऑक्टोबर, २०२४)

**१.** अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये कलम २१ नुसार मुलांचा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराचे कथनानुसार अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ३०.०४.२०२१ रोजी झालेला असून सदर विवाहासंबंधातून त्यांना १ नावे आर्यन १.५ वर्षाचा मुलगा आहे. गैरअर्जदार क्रमांक १ ते ३ अनुक्रमे अर्जदाराचे पती, सासरे व सासु आणि गैरअर्जदार क्र. ४ ते ६ अर्जदाराचे मावस सासरे, मावस सासु आणि मावस दिर आहेत. गैरअर्जदार यांनी अर्जदारावर वेळोवेळी कौटूंबिक हिंसाचार करुन उपरोक्त नमुद मुलाला जबरदस्तीने त्यांचे ताब्यात ठेवलेले आहे. अर्जदाराचा मुलगा – आर्यन फक्त १.५ वर्षाचा असून तो स्तनपान करतो. अर्जदार ही त्याची आई असून आईशिवाय आर्यनचा सांभाळ व्यवस्थित होवू शकत नाही. अर्जदाराच्या मुलाला आईच्या प्रेमाची व स्नेहाची आवश्यकता असल्याने मुलाचा ताबा अर्जदाराला देण्यात यावा.

**३.** प्रस्तुत प्रकरणात मुख्य अर्ज दिनांक १९.०९.२०२४ रोजी दाखल करण्यात आला. त्यानंतर गैरअर्जदार यांना संरक्षण अधिकारी यांचेमार्फत नोटीस काढण्यात आली, त्या अनुषंगाने गैरअर्जदार दिनांक १७.१०.२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले. दिनांक १७.१०.२०२४ रोजी आदेश पारित करुन पुढील तारखेस दिनांक २२.१०.२०२४ रोजी मुलगा आर्यन यास न्यायालया समोर हजर करण्यासंबंधी आदेश पारित करण्यात आला. दिनांक २२.१०.२०२४ रोजी गैरअर्जदार यांनी मुलगा आर्यन यास हजर ठेवले नाही आणि मुलाची तब्येत ठिक नसल्याने न्यायालयात हजर करता आले नाही अशा आशयाचा मुदतीचा अर्ज दिला. त्यावर आदेश पारित करुन प्रकरण आजरोजी दिनांक २४.१०.२०२४ रोजी मुलाला न्यायालया समोर हजर करणेकरिता ठेवण्यात आले. आजरोजी देखील गैरअर्जदार यांनी मुलाची तब्येत ठिक नसल्याने त्याला हजर करु शकले नाही असे कारण देवुन मुदतीचा अर्ज केला. गैरअर्जदार तर्फे असा

युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदार मुलाला स्वतःहुन सोडुन गेली आहे. मुलगा आर्यन आजारी असल्यासंबंधी आजरोजी नि.क्र. १० सोबत गैरअर्जदार यांनी दिनांक १९.१०.२०२४ रोजीची औषधांची चिठ्ठी (Prescription) ची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन मुलगा आर्यन आजारी होता असे दिसुन येते. परंतु २ वेळा संधी देवुन देखील गैरअर्जदार हे मुलगा आर्यन यास न्यायालयासमोर हजर करणेस टाळाटाळ करित असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

**४.** अशा परिस्थितीत गैरअर्जदार यांचे म्हणणे दाखल झाल्यानंतर त्यांचे म्हणणे विचारात घेवुन मुलाचा ताब्या संबंधी आदेश केल्यास अर्जदार आणि मुलगा आर्यन या आई मुलांचा संबंधाला तसेच आर्यन या मुलाचे स्वास्थाला नुकसान पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. आर्यन या मुलाचे वय फक्त १.५ वर्ष आहे आणि ही बाब गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या औषधाच्या चिठ्ठीवरुन स्पष्ट होते. या वयात मुलाला आईच्या प्रेमाची आणि स्तनपानाची आवश्यकता असते. आर्यनचे वय विचारात घेता त्याच्या हिताच्या दृष्टीने प्रस्तुत प्रकरणात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, कलम २१ अन्वये न्यायालयाला दिलेल्या अधिकारान्वये मुलाचा अंतरीम ताबा अर्जदाराकडे देणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>: आ दे श :</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा मुलगा – आर्यन याचा अंतरीम ताबा अर्जदाराला द्यावा.

३. सदर आदेशाची बजावणी संरक्षण अधिकाऱ्या मार्फत करण्यात यावी.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.10.25 11:30:35 +0530

दिनांक : २४/१०/२०२४.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 24/10/2024 |
| Order signed by P.O on | :- | 24/10/2024 |
| Order uploaded on | :- | 25/10/2024 |